GWELD
SEAL OF TRUST

Date: 22-03-2024

To,
Bombay Stock Exchange Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
25th Floor, Dalal Street, Fort,
Mumbai-400001

**Scrip Code: 504028**

**Subject: Newspaper Advertisement – Notice of 62nd Annual General Meeting, Remote E-Voting Information, Record Date and Book Closure, etc.**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 and 47 of Securities And Exchange Board Of India (Listing Obligations And Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of newspaper advertisement issued regarding Notice of 62nd Annual General Meeting of the Company scheduled to be held on April 12, 2024 at 4:30 P.M. through Video Conferencing (VC)/ Other Audio-Visual Means (OAVM), including details with respect to remote e-voting information, record date and book closure.

The notice was published in Business Standard (English Daily) and Navakal (Marathi Daily) (including e-editions). Kindly acknowledge the receipt of the same.

**For GEE LIMITED**

Shankar Lal Agarwal
Digitally signed by Shankar Lal Agarwal
Date: 2024.03.22 17:58:00 +05'30'

Shankar Lal Agarwal
Whole-Time Director & Chairman
DIN: 01205377

**GEE Limited**
**REGISTERED OFFICE**
Plot No. E-1, Road No.7,
Wagle Industrial Estate,
Thane 400 604, Maharashtra, India
P: +91-02225820619 | F: +91 22 2582 8938
W: www.geelimited.com
CIN: L99999MH1960PLC011879

**KALYAN PLANT**
Plot No. B-12 MIDC,
Kalyan Bhiwandi Road,
Saravli, Kalyan 421311, Thane,
Maharashtra, India
P: +91 25 2228 0358/281176/90
F: +91 25 2228 1199
E: geeho@geelimited.com

# सोन्याचा भाव पुन्हा उच्चांकी पातळीवर



■ मुंबई

**सोने** आणि चांदीच्या दरात गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने वाढ होत आहे. आज देखील सोने आणि चांदीच्या दराने नवा उच्चांक गाठला आहे. आज १० ग्रॅम सोन्याचा दर ६६,७७८ रुपये होता. तसेच आज चांदीचा दर ७८,३२३ रुपये होता.

सध्या लग्नसराईचा काळ सुरु आहे. त्यामुळे सोन्याच्या मागणीत मोठी वाढ होत आहे. अशातच सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ होत आहे. दिल्लीतील सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याचा भाव ६६,२५० रुपये होता.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदीच्या किंमतींमध्ये आज वाढ झाली. येत्या काही दिवसांमध्ये गुढीपाडव्याचा सण आहे.

या दिवशी मोठ्या प्रमाणात सोने खरेदी केले जाते. यामुळे येत्या काळातही सोन्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

# सुनील तटकरे यांनी घेतली अनंतराव थोपटे यांची भेट



■ बारामती

**बारामती** लोकसभा मतदारसंघात विजय मिळवण्यासाठी अजित पवार गट आणि शरद पवार गटामध्ये जोरदार रस्सीखेच सुरू असताना आज दुपारी राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांची भोर येथील निवासस्थानी भेट घेत त्यांच्याशी चर्चादेखील केली. दुसरीकडे अनंतराव थोपटे यांचे पुत्र आणि आमदार संग्राम थोपटे हे गेल्या काही दिवसांपासून शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांचा प्रचार करत आहेत.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी अनंतराव थोपटे यांची भेट घेत नवा डाव टाकला होता. शरद पवारांनी ४० वर्षांपासून विरोधक असलेल्या थोपटे यांची भेट घेतल्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. या भेटीत त्यांनी सुप्रिया सुळे यांना सहकार्य करण्याची विनंती केली होती. त्यानंतर अपक्ष निवडणूक लढण्याच्या तयारीत असलेले शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अनंतराव थोपटे यांची भेट घेत अजित पवार दादागिरी करत असल्याचे त्यांच्या कानावर घातले.

आता शरद पवार आणि विजय शिवतारे यांचा डाव मोडीत काढण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवी राजकीय चाल खेळली आहे. अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीच्या अनुषंगाने सुनील तटकरे यांना अनंतराव थोपटे यांच्या भोर येथील निवासस्थानी पाठवून त्यांच्यासोबत चर्चादेखील केली.

# महाविकास आघाडीचा जागावाटपाचा निर्णय दोन दिवसांत - नाना पटोले



■ मुंबई

**लोकसभा** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमधील जागावाटपासंदर्भात बैठकांचे सत्र मुंबई येथे सुरू आहे. महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक शरद पवार यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. बैठकीत जागा वाटपावर आणि सांगली, भिवंडी लोकसभा मतदारसंघाच्या संदर्भात चर्चा झाली. पुढील दोन दिवसांत जागावाटपावर निर्णय जाहीर करणार असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले.

महाविकास आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक आज शरद पवार यांच्या सिल्वर ओक निवासस्थानी पार पडली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, प्रतिभा धानोरकर, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील, अनिल देशमुख आणि सुनील भुसरा उपस्थित होते. बैठकीसाठी वंचितकडून कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्याचे पाहायला मिळाले.

महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळेस ते म्हणाले की, जागावाटप संदर्भात आमच्या मित्रपक्षांसोबत असून त्यांना कसे सहभागी करता येईल यावर आजच्या बैठकीत चर्चा झाली. वंचितचे प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत देखील चर्चा सुरू आहे. आमच्यातील जागावाटपावर एक दोन दिवसांत फायनल होईल. त्यानंतर महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत दोन दिवसांत निर्णय जाहीर करणार असल्याचे नाना पटोले म्हणाले आहेत. सांगली, भिवंडी, नागपूर मतदारसंघातील जागांवर चर्चा सुरू आहे. मित्रपक्षांना सोबत घ्यावे लागणार आहे. त्यामुळे यावर दोन दिवसांत निर्णय लागेल असेही ते म्हणाले.

लोकसभेची उमेदवारी नाना पटोले यांना मिळणार असल्याच्या चर्चा सुरू आहे. या प्रश्नावर उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, माध्यमांमध्ये ज्या नावांची चर्चा सुरू आहे. मात्र जेव्हा पक्षाकडून अंतिम यादी जाहीर होईल त्यावेळेस आपल्या सगळ्यांना उमेदवार कोण कोण आहे ते कळेल. आपणास दिल्लीत जायची इच्छा आहे का, यावर बोलताना ते म्हणाले की, पक्षाच्या आदेशाचे पालन सर्वांनाच करावा लागते.

# धारावीतील घरांच्या पोटमाळ्यांचे सर्वेक्षण! पुनर्विकासात अपात्रच ठरणार

■ मुंबई

**धारावीतील** खोल्यांचे व त्यावरील असलेल्या एक व दुमजली पोटमाळ्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. मात्र पोटमाळे अपात्र ठरणार आहेत. या पोटमाळ्यांची संख्या अंदाजे १ लाखांच्या आसपास असू शकेल, अशी माहिती धारावी पुनर्विकास प्रकल्प कार्यालयातून देण्यात आली.

आशियातील सर्वात मोठी गणली जाणारी झोपडपट्टी धारावी हिचा पुनर्विकास अदानी कंपनी समूह माध्यमातून केला जाणार आहे. येथील झोपडपट्ट्यांची दोन टप्प्यात सर्वेक्षणाची प्रक्रिया पार पडणार आहे. सध्या प्रत्येक झोपडी व त्यांच्या पोटमाळ्यावर सांकेतांक क्रमांक टाकण्यात येत आहेत. मात्र पोटमाळा शासन निर्णयानुसार पात्र केले जाणार नाहीत ते अपात्र ठरवून अशा रहिवाशांना भाडेतत्वावर मुंबईत घरे बांधून दिली जाणार आहेत, असे धारावी पुनर्विकास प्रकल्प कार्यालयाचे म्हणणे आहे.

# राजापुरी हळदीला उच्चांकी भाव
## प्रति क्विंटल ६१ हजारांचा विक्रमी दर

■ सांगली

**सांगली** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीला सोन्याचा भाव मिळाला आहे. हळदीच्या सौद्यात राजापुरी हळदीला ऐतिहासिक ६१ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळाला आहे. बाजार समिती स्थापन झाल्यापासूनचा हा ऐतिहासिक दर आहे.



सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एन. बी. पाटील-शिरगावकर यांच्या अडत दुकानामध्ये अरिहंत बाबू गुळण्णावर व बसाप्पा पराप्पा कोकटनूर या शेतकऱ्यांनी हळद विक्रीसाठी आणली होती. या हळदीच्या सौद्यामध्ये उच्चांकी ६१ हजार रुपयांचा दर देऊन मनाली ट्रेडिंग कंपनी यांनी ती खरेदी केली. सध्या हळद या शेतीमालास उच्चांकी भाव मिळत असून, त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. २०१०-११ यावर्षी हळदीला प्रति क्विंटल ३२ हजार रुपयांचा उच्चांकी दर मिळाला होता. यावेळी सरासरी दरही १५ ते २० हजार रुपये क्विंटल दर होता; पण त्यानंतर हळदीचे दर खूपच कमी झाले. गेल्या वर्षी तर प्रति क्विंटल सहा ते नऊ हजार रुपये दर होता. यामुळे हळद लागण कमी झाली. म्हणूनच सध्या हळदीचे दर वाढले आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हळद विक्रीसाठी सांगलीच्या वसंतदादा मार्केट यार्डामध्ये आणावी, असे आवाहन एन. बी. पाटील-शिरगावकर अडत दुकानदार नितीन पाटील यांनी केले.

# विखे-पाटील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत

■ मुंबई

## अजित नवले यांची पोस्ट



**दुधाच्या** अनुदानाच्या मुद्यावरून दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे डॉ. अजित नवले आक्रमक झाले आहेत. दुधाचे भाव कोसळत आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे.

मात्र दुधाच्या अनुदानावरून दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील जाहिराती करत आहेत. हा प्रकार शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा असल्याचे डॉ. अजित नवले यांनी सांगितले. याबाबत त्यांनी फेसबुकवर पोस्ट केली.

अजित नवले म्हणाले की, अनुदानाची घोषणा झाली. मात्र अटी शर्ती आणि ऑनलाईन डेटाच्या जटीलतेमुळे शेतकऱ्यांना अद्यापही अनुदान मिळालेले नाही. अशा पार्श्वभूमीवर दुग्धविकास मंत्री ५ रुपयांच्या न मिळालेल्या अनुदानाच्या जोरावर शेतकरी श्रीमंत होणार असल्याच्या जाहिराती करत असतील तर यापेक्षा अधिक खेदजनक दुसरी कोणतीही गोष्ट असू शकत नाही. राज्यातील सरकार व दुग्धविकास मंत्र्यांचा अशा जाहिरातीबाबत, असंवेदनशीलतेबाबत आणि निष्क्रियतेबाबत करावा तेवढा निषेध थोडा आहे.

# अनधिकृत गौण खनिज उत्खनन
## सेंट विल्फ्रेड एज्युकेशनला नोटीस

■ पनवेल

**शेडुंग** येथील जमीन मिळकतीमध्ये ९६६ ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणी अप्पर तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, पनवेल यांनी सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी शेडुंग, अध्यक्ष यांना नोटीस बजावली आहे. पनवेल तालुक्यात गौण खनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात चालू असून, पनवेल तहसील कार्यालयातून वरदहस्त मिळत आहे. शेडुंग येथील सर्वे नंबर ९२/अ/१ या जमीन मिळकतीमध्ये अनधिकृत गौणखनिज उत्खनन केल्याबाबत मंडळ अधिकारी यांनी स्थळ पाहणी अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर केला आहे. ९६६ ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याचे अहवालानुसार दिसून आले आहे. सक्षम प्राधिकारी यांची पूर्वपरवानगी घेऊन आवश्यक स्वामित्व धनाची रक्कम शासन जमा करणे आवश्यक होते. मात्र तसे करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाचा महसूल बुडवून शासनाचे आर्थिक नुकसान करण्यात आले.

**CORRIGENDUM**

This is to inform that in NATIONAL COMPANY LAW TRIBUNAL Notice PUBLIC ANNOUNCEMENT (Under Section 102 of the Insolvency and Bankruptcy Board of India Regulations, 2016) FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF Mr. Pravin Kumar Tayal Personal Guarantor of M/s Krishna Knitwear Technology Limited. Published on **12.03.2024 in Financial Express (English) - Gujarat Edition,** please read in **"Sr. No. 13 - Last date for submission of claims - 02-04-2024 instead of 22-03-2024. Other detail will remain same.**

Date: 22-03-2024 Sunil Kumar Agrawal
Place : Ahmedabad, Guj. Resolution Professional

**फॉर्म ए**
**सार्वजनिक उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ, भारत
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)
**मेसर्स आस्तिक ट्रेडींग प्रायव्हेट लिमिटेडच्या** धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

| प्रस्तुत तपशील | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | आस्तिक ट्रेडींग प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | १८/०५/२०१५ |
| ३ | प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे. | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. | U51103MH2015PTC264607 |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | गाळा क्र. ३, सर्वोदय भवन, ३७ रामानंद लेन, प्लॉट क्र. ३६ मालाड (पश्चिम), मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र - ४०००६४. |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख | आदेशाची तारीख : ०५ मार्च, २०२४ आदेश प्राप्त झाल्याची तारीख : २१ मार्च, २०२४ |
| ७ | नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख | १७ सप्टेंबर, २०२४ |
| ८ | अंतरिम विभेदन व्यावसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. अरूण नंदलाल अग्रवाल IBBI/IPA-003/IP-N00282/2020-2021/13234 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यावसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | क्षिरसागर हॉस्पीटलच्या समोर, आर पी रोड, जालना, महाराष्ट्र ४३१ २०३. ईमेल : irparun@gmail.com |
| १० | अंतरिम विभेदन व्यावसायिकासोबत संपर्कासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल | क्षिरसागर हॉस्पीटलच्या समोर, आर पी रोड, जालना, महाराष्ट्र ४३१२०३. ईमेल:cirp.aastik@gmail.com |
| ११ | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | ०४ एप्रिल, २०२४ |
| १२ | अंतरिम विभेदन व्यावसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग | लागू नाही |
| १३ | प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यावसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नाव) | लागू नाही |
| १४ | (अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे : | वेब लिंक: http://www.ibbi.gov.in/downloadform.htm भौतिक पत्ता : मुद्दा क्र. १० मध्ये नमूद असल्यानुसार |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायादा न्यायाधिकरणाने **मेसर्स आस्तिक ट्रेडींग प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया ०५ मार्च, २०२४ रोजी प्रारंभ करण्याचा आदेश दिला, आदेश क्र. सी. पी. (आयबी) ५९५/एमबी/२०२३ आणि तो २१ मार्च, २०२४ रोजी प्राप्त झाला.
मेसर्स आस्तिक ट्रेडींग प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना, याद्वारे त्याचे दावे पुराव्यांसोबत ०४ एप्रिल, २०२४ रोजी किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यावसायिकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.
मुद्दा क्र. १२ समक्ष नमूद अनुसार, प्रवर्ग संबंधित वित्तीय धनको, प्रवर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी मुद्दा क्र. १३ समक्ष सुचिबध्द नादारी व्यावसायिकाकडून त्याच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड प्रपत्र सीएमध्ये दर्शवतील.
खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

अंतरिम विभेदन व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी
दिनांक : २२ मार्च, २०२४ श्री.अरूण नंदलाल अग्रवाल
स्थळ : जालना IBBI/IPA-003/IP-N00282/2020-2021/13234

# मोदींच्या फोटोचा वापर फोर्स मोटर्सविरोधात तक्रार

■ मुंबई

फोर्स मोटर्सकडून वर्तमानपत्रात पहिल्या पानावर जाहिरात प्रकाशित करण्यात आली असून त्यात भारतीय सशस्त्र दलाचे नाव, छायाचित्र आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या फोटोचा वापर करण्यात आला आहे. ही जाहिरात म्हणजे आदर्श आचारसंहितेचा भंग करणारी असून याप्रकरणी आक्षेप घेत वंचित बहुजन युवा आघाडीच्या प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी सी व्हिझीलवर तक्रार दाखल केली आहे. सोबतच या प्रकरणाची वेळीच दखल घेऊन तात्काळ कारवाई करण्याची मागणीदेखील वंचितकडून करण्यात आली आहे.

आदर्श आचारसंहिता असताना सैन्य दलाच्या छायाचित्र आणि नाव वापरून कुठलीही जाहिरात प्रकाशित करता येत नाही. मात्र तरीही आज जवळजवळ सर्व जिल्हा आवृत्तीमध्ये पहिल्या पानावर फोर्स मोटर्सकडून जाहिराती प्रकाशित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये भाजपचे 'आत्मनिर्भर भारत' हे घोषवाक्य आणि प्रधानमंत्री मोदींचे छायाचित्र देखील आहे.

# मराठवाड्यात पहाटे भूकंपाचे दोन धक्के

■ परभणी

मराठवाड्यात आज पहाटे परभणी, नांदेड, हिंगोली या ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले. लागोपाठ दोन धक्के जाणवल्यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ३.६ ते ४.५ इतकी नोंदली गेली. या भूकंपाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. काही सेकंदाच्या या व्हिडिओमोध्ये जमिनीला हादरे बसल्याचे दिसत आहे. मराठवाड्यामध्ये १९९३ साली मोठा भूकंप झाला होता. त्यानंतर आज सर्वात जास्त भूकंपाचे धक्के बसल्याचे सांगितले जात आहे. या भूकंपात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती मिळत आहे.

**MUMBAI DISTRICT EDITION**
**IN THE COURT OF THE DISTRICT MUNSIFF COURT AT HOSUR I.A.NO:-3/2024 IN O.S.NO:-37/2023**

**PLAINTIFF**
**S.ARUN S/O M. K. SETHUM, DOOR NO:-183, VENKATESHWARA NAGAR, PHASE II, NEW RAILWAY STATION, HOSUR TALUK, KRISHNAGIRI DISTRICT.**

**/VERSUS/**

**DEFENDANTS**
**D3. THE MANAGER, RELIANCE ASSET RECONSTRUCTION, 11TH FLOOR, NORTH SIDE, R-TECH PARK, WESTERN EXPRESS HIGHWAY, GOREGOAN (EAST), MUMBAI 400063.**

**NOTICE**

Please take notice the Plaintiff has filed the suit against the above mentioned Defendant No:-3 and If you have got any objection regarding this petition, you should appear before this Hon'ble Court on 29/04/2024 at 10.00 A.M. either in person or through an advocate and file your objection. If you fail to do so the matter will be decided as Exparty.

/BY ORDER OF COURT/

**P.KARTHEKEYAN., B.A.,B.L.,**
ADVOCATE OF
PKK LAW ASSOCIATES,
HOSUR.

**जाहीर सूचना**

आम्ही, (१) **श्री रमेश भुटा**, (२) **श्री महेंद्र भुटा** आणि (३) **श्री नारायण भुटा**, श्रीमती मारुबाई गामदेवी मंदिरसमोर, एन. पी. मार्ग, माटुंगा रोड, गुजराती क्लबजवळ, माटुंगा (पूर्व), मुंबई - ४०० ०१९ येथे स्थित **'गुरू कृपा'** इमारत, पूर्वीची **'बालचंद्र निवास'** चे मालक **श्री. टी. एन. रामक्रिष्णन**, ज्यांचे १९९९ मध्ये किंवा त्या सुमारास निधन झाले होते, त्यांच्या नावे असलेल्या भाडेकरू पावतीमधील हक्क, शीर्षक आणि हितसंबंध **श्री. सतिश लक्ष्मण** यांच्या नावे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेत आहोत. भाडेपट्टी जागा सदनिका क्र. १, **'गुरुकृपा'**, पूर्वीची **'बालचंद्र निवास'**, प्लॉट क्र. २, श्रीमती मारुबाई गामदेवी मंदिरसमोर, एन. पी. मार्ग, माटुंगा रोड, गुजराती क्लबजवळ, माटुंगा (पूर्व), मुंबई - ४०० ०१९ ही आहे.

कोणा व्यक्तीचा भाडेकरू पावतीच्या हस्तांतरणाच्या संबंधात कशाही प्रकारचा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हक्क, शीर्षक आणि हितसंबंध किंवा आक्षेप असल्यास सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना संपर्क करण्याची विनंती आहे. कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास, भाडे पावती **श्री. सतिश लक्ष्मण** यांच्या नावे हस्तांतरित करण्यात येईल.

**यांच्या वतीने,**
**श्री रमेश भुटा,**
**श्री महेंद्र भुटा** आणि
**श्री नारायण भुटा**
सर्वांचा पत्ताः ५१७, श्री कृपा, एच. आर. महाजनी रोड, व्हीजेटीआय प्रिंसिपल्स बंगलो समोर, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०० ०१९.
ठिकाणः मुंबई
दिनांकः २३ फेब्रुवारी, २०२४

**सार्वजनिक सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. दिपक श्रीचंद लुल्ला, गाव दहिसर, तालुका - बोरीवली, मुंबई उपनगर येथे स्थित सीटीएस क्र. १८७२ - १८७५ धारक जमिनीवर बांधलेल्या, बोरीवली निलकमल सीएचएस लि. म्हणून ज्ञात सोसायटीमधील प्रेमजी नगर, बिल्डींग क्र. ए च्या पहिल्या मजल्यावरील मोजमापित क्षेत्रफळ ३६५ चौ. फूट बांधीव क्षेत्रफळाच्या फ्लॅट क्र. १०९ चे मालक (येथून पुढे सदर फ्लॅट म्हणून संबोधण्यात येईल), असे झाले आहे की, अगोदरचे संयुक्त मालक श्री. लिलाधर कालिदास शेठ यांच्या मृत्युनंतर, अन्य संयुक्त मालक श्रीमती लिलावंतीबेन एल. शेठ यां सदर फ्लॅटच्या कायदेशीर मालक झाल्या, त्यांनी सदर फ्लॅट श्रीमती रमिलाबेन कस्तुरचंद शाह यांना विकला. पुढे श्री. दिपक श्रीचंद लुल्ला यांनी सदर फ्लॅट माझे अशील श्रीमती वर्षा जिग्नेश नवादिया आणि श्री. जिग्नेश धिरजलाल नवादिया यांना विक्री करण्याचे कबुल केले आहे. कोणत्याही व्यक्ती/व्यक्तीना सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, तारण, प्रभार, उपहार, न्यास, वारसाहक्क, ताबा, पट्टा, पोट-भाडोत्री, अभिहस्तांकन, हस्तांतरण, भोगवटा, उप-भोगवटा, मृत्युपत्रित देणगी, उत्तराधिकारी, अनुज्ञप्ती, परिरक्षण, प्रलंबित दावा, कर्ज, आगाऊ, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालयाद्वारे पारित निकाल किंवा हुकूमनामा, कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण, जप्ती, समझोता किंवा अन्यथा कोणत्याही पध्दतीने दावा असल्यास, आजच्या तारखेपासून १४ दिवसात बी/१०६, १ ला मजला, सय्यीद मंझिल सीएचएस लि., पंडीत दिनदयाल नगर, बसिन कॅथॉलिक बँक लि. च्या समोर, माणिकपूर, वसई (प), जिल्हा पालघर - ४०१२०२ येथे निम्नस्वाक्षरीकाराना वैध दस्तावेजी पुराव्यासोबत ज्ञात करणे आवश्यक आहे, अन्यथा त्याबाबत कोणतेही दावे अस्तित्वात नाही आणि असल्यास, ते सोडून दिले किंवा परित्याग केले असे मानण्यात येईल आणि माझे अशील सदर फ्लॅटच्या खरेदीची प्रक्रिया करतील.
वसई, दिनांकित २२ मार्च, २०२४

सही/-
**डेव्हीड एस. डाबरे**
वकील, उच्च न्यायालय, मुंबई

**सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **प्रकाश जी. धारगळकर आणि श्री. प्रसाद जी. धारगळकर** (प्रिमियर प्रोडक्ट्सचे भागिदार) (गहाणवटदार) जे याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली त्यांची मालमत्ता, जी त्यांनी **श्री. नितिन मंडलिक** यांच्यासह दिनांक **०९.०४.१९९६** रोजीच्या शिक्काबद्ध अदलाबदल करारनाम्याअंतर्गत संपादित केली होती, तिच्या बदल्यात कर्जाकरिता आमच्या अशिलांकडे आले होते, त्यांच्या शीर्षकाची आमचे अशील तपासणी करीत आहेत. सदर गहाणवटदारांनी आमच्या अशिलास सांगितले आहे की, **नितिन मंडलिक** यांच्या नावाची मूळ कागदपत्रे हरवली आणि गहाळ झाली आहेत आणि योग्य व अत्यंत परिश्रमपूर्वक शोध घेऊन देखील सापडत नाहीत.
कोणा व्यक्तीचा सदर मालमत्तेवर वारसा, गहाणवट, विक्री, भेट, भाडेपट्टी, भाडेकरू, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, वहिवाट किंवा इतर कोणत्याही प्रकारे सदर सदनिकेवर किंवा कशाही प्रकारच्या अन्य कोणत्याही कारणास्तव कोणताही दावा असल्यास त्याबाबत त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांना सदर सूचनेच्या दिनांकापासून **१४ दिवसांच्या** आत त्यांच्या कार्यालयात लेखी कळवावे, असे न केल्यास त्यानंतर आलेले सर्व दावे, जर असल्यास, सोडून दिले असे समजण्यात येईल.

**वर उल्लेखिल्यानुसार मालमत्तेची अनुसूची**

१५१, ले. प्रकाश नारायण कोटणीस मार्ग, मुंबई - ४०००१६ येथे स्थित माहीम विभागाचा सी.एस. क्र. ६४९ धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या श्री समर्थ (माहीम) प्रिमायसेस को-ऑप. हौ. सोसा. लि. असे ओळखल्या जाणाऱ्या समर्थ इंडस्ट्रियल इस्टेट ॲण्ड सोसायटी या इमारतीमधील तळमजल्यावरील गाळा क्र. ७, **मोजमाप** ३१० चौ.फू. चे सर्व खंड आणि तुकडे आणि श्री समर्थ (माहीम) प्रिमायसेस को-ऑप. हौ. सोसा. लि.च्या भाग प्रमाणपत्र क्र. ७ अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह समभाग क्र. ३१ ते ३५ धारण केलेले ५ समभाग.
दिनांक २२ मार्च, २०२४.

सही/-
**(मे. बिलावाला ॲण्ड कं.)**
गहाणवटदाराकरिता
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
करीम चेंबर्स, २ रा मजला, ४२, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

रामेश्वर मीडिया

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website http://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| | |
|---|---|
| **Tender No.** EE/EHV(O&M)/DN/DMB/e-Tender -06/ 2024-2025 **RFx No.-7000030303** **Name of Tender** : Notice for 2nd Call for SRM Tender for hiring of Vehicles (LMV) at 220kV Washala and 220kV Ghatghar sub-stn under EHV O&M Division Dombivali for the period from 01.04.2024 to 31.03.2025. **Estimated Cost** :Rs. 5,96,904/- [Including all taxes] **Tender Fee :-** Rs.500/- + 5% Applicable Taxes (For all above tender) | **Online Downloading the RFx:** 21.03.2024, 10:00 Hrs to 27.03.2024, 23:59Hrs. **Online Submission of the RFx:** On or Before 27.03.2024, 23:59Hrs. **Online Opening of the Techno Commercial response opening date:** 28.03.2024 at 10:00 hrs (If possible). **Price Bid Opening Date:** 29.03.2024 at 10:00 hrs (If possible). |

For further details visit our website **:-http://srmetender.mahatransco.in**
Contact Person :-The Dy. Executive Engineer, (O) Mob No. :- 9833266055
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer, EHV O&M Dn Dombivali**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमच्या अशिलांच्या सूचनेअंतर्गत आम्ही याखाली लिहिलेल्या मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव आंबिवली, तालुका अंधेरी च्या सीटीएस क्र. ८३२/१, सर्व्हे क्र. १४२ चा प्लॉट क्र. १४२/५ धारण केलेल्या मोजमाप ६३५० चौरस यार्ड्स समतूल्य ५,३१० चौरस मीटर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे असलेल्या स्थावर मालमत्तेच्या संदर्भात १४२/५, जय प्रकाश रोड, सात बंगलोज बस डेपोसमोर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५३ येथे पत्ता असलेल्या व त्यासह मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव आंबिवली, तालुका अंधेरी येथे स्थित असलेली आणि वसलेली ३ (तीन) वरील मजल्यांचा समावेश असलेली आणि १२ (बारा) विंग्ज समाविष्ट असलेली "बाळकृष्ण" म्हणून ओळखली जाणारी त्यावरील उभी इमारत या नोंदणीकरण क्र. बीओएम/एचएसजी/१०५२/१९६५ दिनांक ७ ऑक्टोबर, १९६५ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या तरतुदींअंतर्गत योग्यरित्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था बाळकृष्ण को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड (यापश्चात "सदर मालमत्ता" असे उल्लेखित) च्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.
स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक/का, वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे मंडळ, स्थापित असलेले अथवा नसलेले, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्ती/संस्था ज्यांचा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये वारसा, विक्री, हस्तांतरण, भाग, गहाणवट, तारण, प्रभार, भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, नियुक्ती, भाडेकरार, भेट, अदलाबदल, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहीवाट, न्यास, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालय/न्यायाधिकरण किंवा प्राधिकरणाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करार, लिखिते, करारपत्र, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, मुखत्यारपत्र, पूर्वखरेदी, प्रथम नकाराचा अधिकार, किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही लाभ, शीर्षके, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत अशा दाव्याच्या, जर असल्यास, कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना डीएम लीगल असोसिएट्स, ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर, पत्ता १० यशवंत चेंबर्स, ३ रा मजला, बी. भरूचा मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे व त्याची प्रत डीएम लीगल असोसिएट्स, ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर, पत्ता कार्यालय क्र. ९११, ९ वा मजला, टेक्नो पार्क, न्यू लिंक रोड, देवीदास लेन विस्तार, बोरीवली (प), मुंबई - ४०० ०९२ येथे सूचित करावे. असे न केल्यास, असे समजण्यात येईल की असा दावा/दावे सोडून दिला किंवा गुंडाळून ठेवला आणि आमच्या द्वारे सदर मालमत्तेकरिता मालकाचे शीर्षक स्पष्ट आणि विक्रीयोग्य आहे असे प्रमाणित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव आंबिवली, तालुका अंधेरीच्या सीटीएस क्र. ८३२/१, सर्व्हे क्र. १४२ चा प्लॉट क्र. १४२/५ धारण केलेल्या मोजमाप ६३५० चौरस यार्ड्स समतूल्य ५,३१० चौरस मीटर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे व त्यासह मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव आंबिवली, तालुका अंधेरी येथे स्थित असलेली आणि वसलेली ३ (तीन) वरील मजल्यांचा समावेश असलेली आणि १२ (बारा) विंग्ज समाविष्ट असलेली "बाळकृष्ण" म्हणून ओळखली जाणारी त्यावरील उभी इमारत आणि तिच्या चतुःसीमा खालीलप्रमाणेः-
उत्तरेस किंवा त्यादिशेनेः जय प्रकाश रोड द्वारे;
पूर्वेस किंवा त्यादिशेनेः प्लॉट क्र. १४२/४ द्वारे;
दक्षिणेस किंवा त्यादिशेनेः वर्सोवाच्या ग्राम सीमेद्वारे;
पश्चिमेस किंवा त्यादिशेनेः भागशः वर्सोवाच्या ग्राम सीमेद्वारे आणि भागशः प्लॉट क्र. १४२/६ द्वारे.
दिनांकः २२ मार्च, २०२४
ठिकाणः मुंबई

**डीएम लीगल असोसिएट्स**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर

GWELD
SEAL OF TRUST

**जीईई लिमिटेड**

**सीआयएनः** L99999MH1960PLC011879
**नोंदणीकृत कार्यालयः** प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे, महाराष्ट्र-४००६०४.
**दूर.क्र.:** +९१-०२२-२५८२१२७७, **वेबसाईटः** www.geelimited.com **ईमेलः** shares@geelimited.com

**व्हिडियो कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर दृक्-श्राव्य माध्यमे (ओएव्हीएम)द्वारे घेण्यात येणाऱ्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी माहिती**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे पारित सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दि. ८ एप्रिल, २०२० आणि सर्वसाधारण परिपत्रक क्र. १७/२०२० दि. १३ एप्रिल, २०२० आणि सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ सह वाचावयाच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०२/२०२१ दि. १३ जानेवारी, २०२१, सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२० दि. ५ मे, २०२० अन्वये एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे कामकाज करण्याकरिता कंपनीची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार, दि. १२ एप्रिल, २०२४ रोजी सायं. ०४.३० वाजता व्हीसी/ओएव्हीएमद्वारे घेण्यात येणार आहे. एजीएमची सूचना आणि वि.व. २०२२-२३ करिता वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती गुरूवार, दि. २१ मार्च, २०२४ रोजी ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्(स) कडे नोंदणीकृत आहेत, त्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आल्या आहेत. वरील उल्लेखित परिपत्रकांनुसार, कंपनीने वार्षिक अहवालाची छपाई केलेली नाही आणि म्हणून वार्षिक अहवालाच्या हार्ड कॉपी देण्यात येणार नाहीत.

कट-ऑफ दिनांकास म्हणजेच शुक्रवार, दि. ०५ एप्रिल, २०२४ रोजी भौतिक स्वरुपात किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात भाग धारण करणारे सदस्य, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण आणि विशेष व्यवसायावर त्यांचे मत एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर जागेवरून एनएसडीएलच्या ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे ("रिमोट ई-मतदान") देऊ शकतील. सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते कीः

१) एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्वसाधारण आणि विशेष व्यवसायाचे कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाद्वारे केले जाईल.
२) रिमोट ई-मतदान मंगळवार, दि. ९ एप्रिल, २०२४ रोजी स. १०.०० वाजता सुरू होईल.
३) रिमोट ई-मतदान गुरूवार, दि. ११ एप्रिल, २०२४ रोजी सायं. ५.०० वाजता बंद होईल.
४) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाची पात्रता निश्चित करण्याकरिता शुक्रवार, दि. ५ एप्रिल, २०२४ हा कट-ऑफ दिनांक आहे.
५) एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कोणा व्यक्तीने कंपनीचे भाग संपादित केले असल्यास आणि कंपनीचा सदस्य झाला असल्यास आणि कट-ऑफ दिनांक म्हणजेच शुक्रवार, दि. ५ एप्रिल, २०२४ रोजी भाग धारण करीत असल्यास, तो खालील ईमेल आयडींवर विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकेलः
अ) shares@geelimited.com
ब) helpdesk.evoting@nsdlindia.com
क) rnt.helpdesk@linkintime.co.in

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी कीः
अ) मतदानाकरिता उपरोल्लेखित दिनांक आणि वेळेनंतर रिमोट ई-मतदान यंत्रणा एनएसडीएलद्वारे बंद करण्यात येईल आणि एकदा सदस्यांद्वारे ठरावावर मत दिल्यानंतर, सदस्यास त्यानंतर ते बदलू शकणार नाहीत;
ब) एजीएममध्ये मतदानाकरिता सुविधा एनएसडीएलच्या ई-मतदानाद्वारे उपलब्ध करून दिली जाईल;
क) ज्या सदस्यांनी त्यांचे मत याआधीच एजीएमपूर्वी रिमोट ई-मतदानाद्वारे दिलेले असेल ते देखील एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु ते त्यांचे मत पुन्हा देऊ शकत नाहीत;
ड) ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ दिनांकास सदस्यांच्या नोंदवही किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदविलेले असेल ते रिमोट ई-मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र असतील.

ई-मतदानाच्या सूचनांसह एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.geelimited.com येथे आणि एनएलडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध आहे आणि कोणत्याही शंका असल्यास, सदस्यांनी www.evoting.nsdl.com च्या हेल्प सेक्शनमधील सदस्यांकरिता नियमित विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि सदस्यांकरिता ई-मतदान युजर मॅन्यूअलचा वापर करावा किंवा श्री. आदित्य जलान, कंपनीचे कंपनी सेक्रेटरी यांना ईमेल आयडी shares@geelimited.com येथे संपर्क साधावा. सभेपूर्वी किंवा दरम्यान तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधी कोणत्याही सहाय्याकरिता, हेल्पलाईन क्रमांक +०२२-२५८२१२७७ येथे संपर्क साधावा.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
सही/-
**शंकर लाल अगरवाल**
**पूर्ण-वेळ संचालक आणि अध्यक्ष**
**दिनांकः २२ मार्च, २०२४** **DIN: 01205377**

रामेश्वर मिडीया

